२९७

महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१
राज्य शासकीय अधिका-यांना वैद्यकीय तपासणी सुविधा

**महाराष्ट्र शासन**

सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य ३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ ऑगस्ट, २००६

**वाचा :-** शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य ३, दि.१ डिसेंबर, १९९८

**प्रस्तावना :-** शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य ३, दि.१ डिसेंबर, १९९८ अन्वये राज्याच्या शासन सेवेतील ४५ अथवा त्यावरील वयोगटातील व रु.३७००-५००० (नवीन वेतनश्रेणी रु.१२०००-१६५००) व त्यावरील वेतनश्रेणी संवर्गातील अधिका-यांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी खाजगी रुग्णालयांतून किंवा वैद्यकीय संस्थांमधून उपरोल्लेखित शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या वैद्यकीय तपासण्या ३ वर्षातून एकदा करुन घेण्यास व त्यावरील खर्चाची रु.३०००/- च्या कमाल मर्यादेत प्रतिपुर्ती करण्यास मंजुरी देण्यात आली होती. सदर कालावधी व खर्चाच्या मर्यादेमध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शासन निर्णय सा.आ.वि.क्र.एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य ३, दि.१ डिसेंबर, १९९८ मध्ये, या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे बदल करण्यांत येत आहे.

१) राज्याच्या शासन सेवेतील ४५ वर्षे अथवा त्यावरील वयोगटातील रु.१२०००-१६५०० या वेतनश्रेणी संवर्गातील अधिका-यांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी खाजगी रुग्णालयातून किंवा तत्संबंधीत वैद्यकीय संस्थांमधून सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या वैद्यकीय तपासण्या दोन वर्षातून एकदा करुन घेता येतील.

२) वैद्यकीय तपासण्यांवरील प्रतिपुर्तीची मर्यादा रु.५०००/- इतकी करण्यांत येत आहे.

३) वैद्यकीय तपासण्या/चाचण्या एकाचवेळी अनिवार्य न करता वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे व आवश्यकतेनुसार अनुज्ञेय कालावधीत रु.५०००/- खर्चाच्या मर्यादेत चाचण्या करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देताना, कार्यालय प्रमुख किंवा इतर सक्षम अधिकारी यांनी संबंधित अधिका-याने वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा दावा २ वर्षातून एकदाच केलेला आहे. याची खातरजमा करुन, त्यानुसार प्रमाणित करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आवश्यक ती नोंद संबंधित अधिका-यांच्या सेवा पुस्तकात घेणे आवश्यक राहील.

३. यावरील खर्च संबंधित अधिका-यांच्या आस्थापनेवरील वेतन व भत्त्यासाठी असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. हे आदेश, दिनांक १ सप्टेंबर, २००६ पासून लागू करण्यात येत आहेत.

५. हे आदेश, वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२४६/सेवा ५, दि.२१ ऑगस्ट, २००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र. मो. आडे )
कार्यासन अधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा -
आवक नं. -
8 NOV 2006
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं. -
प्र. लि. नि.उ.जि. जिल्हाधिकारी

प्रति :- मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.एमएजी १०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य ३,
दि.३१ ऑगस्ट, २००६ चे सहपत्र.

"परिशिष्ट"

The tests carried out under the comprehensive scheme are :-

A) **Blood CBC (Complete Blood Count)**
**Blood Group**
**ESR (Erythrocyte Sedimentation Rate)**
**Fasting Blood Sugar**
**2 Hour Random Blood Sugar**
**Lipid Profile**
**Total Cholesterol**
**Triglycerides**
**Phospholipids**
**Liver Profile**
**Bilirubin**
**Total Proteins**
**A/G Ratio (Albumin/Globulin)**
**HDL/LDL/VLDL (High Density Lippoproteins/Low Density Lippoproteins/Very Low Density Lippoproteins)**
**CPK (Creatinine Phospho Kinase)**
**Renal Profile**
**SGPT/ALT (Serum Glutamin Trans Phosphote/Alanine Transaminase)**
**SGOT/AST (Serum Glutamin Oxaloacetic Transaminase/Aspailate Transaminase)**
**Alkaline Phosphotase**
**LDH (Lactic Dehydrogenase)**
**Prothrombin Time**
**Australia Antigen (Hepatits-B)**
**Serum Sodium**
**Serum Pottassium**

B) **Urine Routine**
**BUN (Blood Urea Nitrogen)**
**Urea**
**Uric Acid**
**Serum Creatinine**
**Serum Bicarbonates**
**Calcium**
**Phosphorous**

C) Stool Routine

D) X-Ray (Chest)

E) ECG/2 - D Echo / Stress Test

F) Pap Smear for Ladies

G) ADDITIONAL TEST
1) G 6 PD (Glucose Dehydrogase)
2) Acid Phosphatase for Gents/Ladies
3) Audiogram (Ear Test)
4) Spiromatry (Respiratory Capacity)
5) Sonography (Any Mass Cyst Test)
6) Gynaecologist's Consultation
7) Ophthalmologist's Consultation
8) Mamography
9) Cardiac Thaliam Scanning

---